# सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ द्यावी ; सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयात सोयाबीन उधळत लक्ष्यवेधी आंदोलन

बीड । दिव्य न्युज

बीड जिल्ह्यातील सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रें बंद झाल्याने २३ हजार शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदीविना घरात पडुन असुन शेतकऱ्यांना खुल्या बाजारात सोयाबीन विकावे लागुन प्रति क्विंटल १००० रूपये आर्थिक नुकसान टाळण्यासाठी हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ देण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१० सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांना मुदतवाढ द्यावी घोषणाबाजी करत सोयाबीन उधळुन सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाबद्दल तिव्र संताप व्यक्त केला.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार,पांडुरंग हराळे, बप्पासाहेब पवार, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे

आदी सहभागी होते. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पणनमंत्री जयकुमार गोरे, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन देण्यात आले.

बीड जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी ४४ हजार ७४४ शेतकऱ्यांनी नाफेडकडे सोयाबीन खरेदीसाठी १ आक्टोबर ते १५ सप्टेंबर पर्यंत ऑनलाईन अर्ज केले होते.त्यानंतर १५ आक्टोबर २०२४ पासुन नाफेडच्या वतीने जिल्ह्यातील ३० केंद्रावर ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्ह्यातील २० हजार

९६९ शेतकऱ्यांची ५ लाख ९४ हजार २०१ क्विंटल सोयाबीन खरेदी करून केंद्र बंद करण्यात




आले.मात्र नोंदणी केलेले २३ हजार ७७५ शेतकरी वंचित राहिले असल्याने आजही त्यांच्या घरात सोयाबीन पडुन आहे. हमीभाव खरेदी केंद्रे बंद झाल्याने शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १००० रुपये आर्थिक नुकसान ; शेतकऱ्यांची बिनबोभाट लुट शासनाने हमीभाव खरेदी केंद्रे बंद केल्याने आता शेतकऱ्यांना हे सोयाबीन खुल्या बाजारात बेभावाने विकावे लागणार आहे.

शासनाने यावर्षी सोयाबीनला ४८९२ रुपये हमीभाव दिला होता. खर्च आणि उत्पन्नाचे गणित जुळवताना हा भाव शेतकऱ्यांना परवडणारा नाही.मात्र पर्याय नसल्याने शेतकरी शासनाच्या खरेदी केंद्रावर सोयाबीन विक्री करत होते.आता हे खरेदी केंद्रेही बंद केल्याने शेतकऱ्यांना खुल्या बाजारात ३८०० ते ४००० रूपये प्रति क्विंटल दराने बेभाव विक्री करावी लागत आहे. वास्तविक पाहता आधारभूत धान्य खरेदी किंमतीपेक्षा कमी दराने सोयाबीन अथवा ईतर कोणताही शेतीमाल खरेदी करणं कायद्याने गुन्हा आहे.परंतु याची पडताळणी करणारी यंत्रणाच नसल्याने शेतकऱ्यांची बिनबोभाट लुट सुरू आहे.

त्यामुळे शासनाने हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

**सरकार दुतोंडी त्यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे वेगळे :- डॉ.गणेश ढवळे**

अर्थमंत्री निर्मला सितारामन म्हणतात विकासाचे पहिले इंजिन कृषी क्षेत्र आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतातकृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (**Artificial Intelligence** ) वापर करा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेहमीप्रमाणे म्हणतात महाराष्ट्राचा दुष्काळ संपवणार कृषी मंत्री शेतकऱ्यांना ड्रोनचा शेतीमध्ये वापर करण्याचा सल्ला देतात मात्र दुसरीकडे शेतकरी विरोधी धोरणे राबवतात. एकंदरीत सरकारचा हा दुटप्पीपणा असुन यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहेत.याबद्दल शेतकऱ्यांमध्ये तिव्र नाराजी आहे.

# उद्धव ठाकरे यांचे तीन बडे शिलेदार देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला, राजकीय हालचालींना वेग



मुंबई । दिव्य न्युज

महाराष्ट्रातील राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर राजकीय हालचालींना वेग आला आहे. सोमवारी भाजप, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि राज ठाकरे यांची मनसे या तीन पक्षांमध्ये अचंबित वाटणाऱ्या राजकीय हालचाली घडला. सकाळी मनसे नेते राज ठाकरे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. राज ठाकरे यांच्या निवासस्थानी 'शिवतीर्थ'वर या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांचे तीन मोठे शिलेदार दुपारी मुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी दाखल झाले. त्यामुळे राज्यातील राजकारणात या गोष्टींची चर्चा सुरु झाली असून वेगवेगळे अर्थ काढले जात आहे.

उद्धव ठाकरे यांचे हे शिलेदार सागर बंगल्यावर

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांचे तीन प्रमुख शिलेदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर सोमवारी दुपारी दाखल झाले. त्यात मिलिंद नार्वेकर, सुभाष देसाई, अंबादास दानवे यांचा समावेश होता. त्यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दादरमधील बाळासाहेब ठाकरे यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी ही भेट झाल्याचे खासगीरित्या या नेत्यांकडून सांगण्यात आले.

बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. पुढील कामासाठी ही भेट होती. भेटीनंतर या तिन्ही नेत्यांनी माध्यमांशी संवाद साधला नाही. अंबादास दानव यांनी बोलण्याचे टाळले. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासंदर्भात ही भेट होती की इतर कोणते राजकीय कारण होते? याबाबत चर्चा सुरु झाली आहे.

राज ठाकरे-फडणवीस भेटीचा अर्थ काय?

राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट, त्यानंतर उद्धव ठाकरे यांचे प्रमुख शिलेदार आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट या सर्व घडामोडींचा अर्थ वेगवेगळा काढला जात आहे. राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात झालेली भेट ही अनौपचारिक होती, असे आता भजपा नेते सुधीर मुनगंटीवार सांगत आहेत. परंतु राजकीय निरीक्षक या भेटीचे वेगवेगळे अर्थ काढत आहे. राज ठाकरे यांनी नुकतीच विधानसभा निवडणुकी निकालाबाबत शंका उपस्थित केली होती.

# शासकीय आधारभूत खरेदी केंद्र तात्काळ सुरू करा अन्यथा तीव्र आंदोलन - राजेभाऊ फड

## शेतकऱ्यांची सोयाबीन हमीभावाने खरेदी करण्याची मागणी

परळी वैजनाथ । दिव्य न्युज

परळी वैजनाथ तालुक्यातील शासकीय आधारभूत खरेदी केंद्र बंद पडल्याने सोयाबीन उत्पादक शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा यासाठी सरकारने तातडीने खरेदी केंद्रे सुरू करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे. परळी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सोयाबीनचे उत्पादन होते. मात्र, यंदा खरेदी केंद्र वेळेवर न उघडल्याने शेतकऱ्यांना हमीभावाऐवजी बाजारात कमी दर मिळत आहे. परिणामी, त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. नाफेड कडे नोंदणी केलेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी केवळ ५०% शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. अजूनही नोंदणीकृत शेतकरी प्रतीक्षेत असून वाहनांच्या लांबच लांब रांगा खरेदी केंद्राबाहेर लागल्या आहेत.

परळी वैजनाथ तालुक्यात एकूण तीन शासकीय हमीभाव केंद्र असून ती एकतर वेळेवर सुरू झाले नाहीत, सुरू करण्यात आले तरी अल्प कालावधीसाठी सुरू ठेवण्यात आले होते. शेतकऱ्यांची लाखो टन सोयाबीन अद्यापही घरी पडून आहे. शासकीय हमीभाव केंद्र बंद करण्यात आले असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड आक्रमक झाले आहेत. शासन आणि प्रशासनाला इशारा देत त्यांनी म्हटले आहे की, शेतकऱ्यांना हमीभाव मिळण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलली पाहिजेत. शासकीय हमीभाव केंद्रामार्फत सुरू असलेली खरेदी का बंद करण्यात आली? असा सवाल त्यांनी विचारत खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्यात यावीत अशी मागणी केली आहे. हमीभाव केंद्र सुरू करण्यास उशीर झाल्यास हजारो शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल आणि त्याचा फटका ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसू शकतो. सरकारने या गंभीर परिस्थितीकडे त्वरित लक्ष द्यावे, अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल. आम्ही केलेल्या मागणीची तत्काळ दखल न घेतल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. बीड जिल्ह्यात नाफेडचे ३० सोयाबीन खरेदी केंद्र आहेत. या खरेदी केंद्राच्या माध्यमातून अर्ध्या शेतकऱ्यांचे देखील सोयाबीन खरेदी करण्यात आले नाही. एकूण ४४७४४ शेतकऱ्यांनी नाफेडकडे नोंदणी केली होती, परंतु झालेल्या खरेदीतही बारदाना, कडता, हमालीच्या नावावर शेतकऱ्यांची लूट केली जात आहे. नोंदणी झालेल्यांपैकी ५०% शेतकरी अजूनही प्रतीक्षेत असून, केंद्राबाहेर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. अगोदरच अस्मानी संकटाने त्रस्त झालेला बळीराजा आता या सुलतानी सरकारच्या तुघलकी कारभाराने संकटात सापडला असल्याचा घणाघात राजेभाऊ फड यांनी केला असून, शेतकऱ्यांसाठी आपण संघर्षाची तयारी ठेवल्याचे म्हटले आहे.

# सिरसाळा-सोनपेठ रस्त्याचे काम सुरू

## दीर्घ प्रतीक्षेनंतर तीन किमी अंतराचे डांबरीकरण होणार

सिरसाळा । दिव्य न्युज

: तालुक्यातील महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या सिरसाळा-सोनपेठ या तीन किमी अंतराच्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामास अखेर मुहूर्त मिळाला आहे. हे काम दर्जेदार करावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

या रस्त्याचा प्रश्न बातमीतून मांडला होता.

परभणी जिल्ह्याला जोडणारा सिरसाळा-सोनपेठ या आठ किलोमीटरपर्यंतच्या रस्त्याचे काम दर्जेदार झाले होते. परंतु, तीन किमीपर्यंतचे काम खूप वर्षापासून रखडल्याने ग्रामस्थांत ओरड होती. ठिकठिकाणी या रस्त्यावर खड्डे पडलेले होते. तालुक्यातील कानडी, आचार्य टाकळी, कौडगाव घोडा, हुडा, गाढे पिंपळगाव ही गावे या रोडवर येत असल्याने या नागरीकांना कसरत करावी लागत असे. तसेच विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, पादचारी, कारखान्याची ऊस वाहतूक, वाळूचे टिप्पर, राखेचे हायवा, वीट वाहतूक सारखी या मार्गाने असते.

या रस्त्याचा प्रश्न मांडल्यानंतर आता रखडलेल्या कामाला सुरवात झाली आहे. हा रस्ता दर्जेदार झाल्यास नागरिकांची वेळेची, पैशांची बचत होऊ शकते. त्यामुळे हे काम दर्जेदार करण्याची मागणी होत आहे.



**सिरसाळा** : सोनपेठ रोडवरील खड्डे बुजविण्याच्या कामास सुरवात झाली आहे.

# ...मग याच न्यायानं वाल्मिक कराडलाही माफ करायचं? जितेंद्र आव्हाडांचा सुरेश धसांना थेट सवाल

मुंबई । दिव्य न्युज

परभणीतील सोमनाथ सुर्यवंशी मृत्यू प्रकरणावरून शरद पवार गट राष्ट्रवादीतील आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भाजप आमदार सुरेश धस यांच्यावर हल्लाबोल केलाय. जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या एका ट्विटमध्ये, परभणी प्रकरणात पोलिसांवर गुन्हे दाखल व्हावेत हा आग्रह धरू नका, असं सुरेश धस एका व्हिडीओमध्ये बोलताना दिसताय. तर काही गोष्टींमध्ये मोठ्या मनाने माफ करायचं असतं, असंही सुरेश धस यांनी म्हटलं होतं. त्यावरून आव्हाडांनी सुरेश धस यांच्यावर निशाणा साधला आहे. 'मग याच न्यायाने वाल्मिक कराडलाही माफ



करायचं का?', असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केलाय. आव्हाडांनी ट्विटमध्ये असं म्हटलंय, दुसर्याच्या घरातील माणसाचा खून झाला तर तिसर्याने येऊन, जाऊ द्या, त्याला माफ करा, हे बोलणे खूप सोपे असते. पोटच्या पोराचा जीव गेल्यानंतर आईला काय वाटत असेल, हेही जर बोलणार्यास कळू नये याला काय म्हणावे. सगळ्याच ठिकाणी राजकारण करून आपली पोळी भाजण्याची सवय वाईटच असते. पण, कुठल्याही परिस्थितीत कुणालाही माफी मिळणार नाही. ज्यांनी सोमनाथला मारलंय, त्यांना कायद्याचा मार बसेलच; याची खात्री आम्ही देतो. एवढेच जर आपल्यामध्ये क्षमायाचनेचे भाव असतील तर कृपया आपण हिमालयात जाऊन साधूसंत व्हावे आणि वाल्मिक कराडलाही माफ करावे. सोमनाथ सुर्यवंशी छोट्या समाजाचा, मागे पाठबळ नाही, म्हणून सोमनाथला मारणाऱ्यांना माफ करावे, ही भावनाच मूळात वर्णवर्चस्ववादी आहे. खून हा खून असतो अन् खुनाला माफी नाही. हा खूनच आहे अक्षय शिंदेचा खूनच आहे; सोमनाथ सुर्यवंशीचा खूनच आहे आणि संतोष देशमुखचाही खूनच आहे. तिघांच्याही खुनाला माफी नाही, असं आव्हाडांनी म्हटलं.

# इयत्ता १२ वीची परीक्षा उद्यापासून

मुंबई । दिव्य न्युज

बारावीच्या परीक्षेला उद्यापासून सुरुवात होणार आहे. या वर्षी दहा दिवस आधीच इयत्ता बारावीची परीक्षा घेतली जाणार आहे. यावर्षी बारावीच्या परीक्षेसाठी एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. उद्यापासून बारावीची परीक्षा सुरू होणार असल्यानं या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषद घेतली आहे.

बारावीच्या परीक्षेला उद्यापासून सुरुवात होणार आहे. या वर्षी दहा दिवस आधीच इयत्ता बारावीची परीक्षा घेतली जाणार आहे. यावर्षी बारावीच्या परीक्षेसाठी एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. परीक्षा दहा दिवस आधी घेतली जाणार आहे. त्यासंदर्भात हरकती मागवण्यात आल्या होत्या. १० दिवस आधी परीक्षा घेत असल्यामुळे विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. निकालही लवकर जाहीर करणार आहोत, १५ मेपर्यंत निकाल जाहीर करण्याचा प्रयत्न असेल असं शरद गोसावी यांनी म्हटलं आहे.



पुढे बोलताना ते म्हणाले की, या वर्षी बारावीच्या परीक्षेसाठी एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यामध्ये ८ लाख १० हजार ३४८ मुले आणि ६ लाख ९४ हजार ३५२ मुली आहेत. तर ३७ ट्रान्सजेंडर उमेदवार आहेत. या पैकी ७ लाख ६८ हजार ९६७ विद्यार्थी विज्ञान शाखेची परीक्षा देणार आहेत. ३ लाख ८० हजार ४१० विद्यार्थी कला शाखेची तर ३ लाख १९ हजार ४३९ विद्यार्थी वाणिज्य शाखेची परीक्षा देणार आहेत.

सर्व परीक्षार्थ्यांना परीक्षेच्या अर्धा तास आधी केंद्रावर हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना १० मिनिटं वाढवून दिले जाणार आहेत, या आधी पेपरच्या आधी १० मिनिटं वाढवून दिले जात होते, परीक्षा केंद्रावर गैर प्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे यांच्यावर देखील पात्र आणि अजामीन पात्र गुन्हा दाखल केला जाणार आहे. संवेदनशील परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेराद्वारे निगराणी ठेवली जाणार आहे. परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळल्यास संबंधित केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जाणार आहे. तसेच प्रश्नपत्रिका फुटू नये म्हणून जीपीएससह लाइव्ह ट्रॅकिंग, व्हिडीओ चित्रीकरणंही केलं जाणार असल्याची माहिती गोसावी यांनी दिली आहे.





जिल्हा रूग्णालयात असलेले स्वच्छतागृह बंद होते. ते आता निवेदन दिल्यानंतर सुरू झाले आहे. यामुळे हाल थांबणार आहेत.

# दिव्य वार्ता

सोमवार १० फेब्रुवारी २०२५ | ४


## राज्यात उन्हाच्या झळा वाढल्या

नागपूर । दिव्य न्युज

रात्री आणि पहाटे थंडी तर दिवसा मात्र उन्हाच्या तीव्र झळा. गेल्या आठ दिवसांपासून राज्यातील वातावरण असेच काहीसे झाले आहे. पण आता मात्र उन्हाच्या झळा आणखी तीव्र होणार आहेत. राज्यातील तापमानात मोठ्या प्रमाणात बदल होत असून कमाल तापमानात वेगाने वाढ होत आहे. तर



किमान तापमान देखील वाढायला लागले आहे. मध्य महाराष्ट्र ,मराठवाड्यात किमान व कमाल तापमान चढेच असून येत्या २४ तासात हळूहळू एक ते दोन अंशांनी तापमान घसरण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार सध्या वायव्य राजस्थान व परिसरात चक्रकार वाऱ्यांची स्थिती सक्रिय आहे. दरम्यान राज्यात कोरडे व शुष्क वारे वाहत असून उन्हाच्या तीव्र झळा नागरिकांना बसत आहेत.

# ...तर गोपीनाथ मुंडेंवर प्रेम करणाऱ्यांचा वेगळा पक्ष उभा राहील; पंकजा मुंडेंनी जाहीर भाषणात सांगितले

नाशिक । दिव्य न्युज

नाशिकमधील श्री.स्वामी समर्थ कृषी विकास व संशोधन चॅरिटेबल ट्रस्ट, दिंडोरी आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित जागतिक कृषी महोत्सवाचे आज (रविवारी) मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. पंकजा मुंडे यांन शहरीकरण आणि नागरीकरण वाढत असताना पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन होणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि नद्या पुनर्जीवित करीत पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन यावेळी केले.

पंकजा मुंडे यांनी स्व.गोपीनाथ मुंडे यांचा देखील उल्लेख आपल्या भाषणात केला. त्या म्हणाल्या, 'गोपीनाथ मुंडेसाहेबांवर प्रेम करणाऱ्या लोकांचा एक साठा केला तर वेगळा एक पक्षच उभा राहील. गोपीनाथ मुंडेसाहेबांवर प्रेम करणाऱ्या लोकांची येवढी मोठी संख्या आहे.' 'मुंडेसाहेबांवर प्रेम करणारे आणि माझ्याबरोबर जोडले गेलेले लोक हे केवळ मी मुंडेसाहेबांची मुलगी म्हणून माझ्यासोबत जोडले जाऊ शकले नसते. लोक गुणाचा वारसा स्वीकारतात. लोकं मुंडेसाहेबांच्या गुणांवर प्रेम करतात म्हणून जसं त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांचा पक्ष उभाच आहे. मुंडेसाहेबांनी भाजपच्या जन्मापासून काम केले आहे तो उभा केला आहे.', असे देखील पंकजा मुंडे म्हणाल्या.

### मुंडेंच्या कार्यक्रमाला हजेरी;चर्चांना उधान

दिंडोरीमधील स्वामी समर्थ केंद्रात संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे लपल्याचा आरोप भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई यांनी केला होता. विष्ण चाटे अद्यापही फरार आहेत. त्यातच पंकजा मुंडे यांनी नाशिकच्या दौऱ्यात स्वामी समर्थ केंडरच्या कार्यक्रमाला हजेरी लावली. त्यामुळे राजकीय चर्चांना उधान आले आहे.



## डॉ.बाबासाहेबांची चळवळ ही व्यक्ती पूजक नाही, प्रत्येकाने संविधान समजून वाचावे-ॲड.वैशाली डोळस

जिंतूर /। दिव्य न्युज : सालेह चाऊस

जिंतूर येथे रमाबाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त दिनांक०८ फेबुवारी रोजी कार्यक्रमाच्या वेळी संबाधन केले की, तलवारीची गरज नाही आज समाजाला ज्ञानाची गरज आहे धुळखात पडलेल्या पुस्तकांवरची धूळ काढून त्याचे वाचन करा. बाबासाहेबांनी ज्ञानाचा वापर राष्ट्रहितासाठी केला. त्यामुळे समाजाने बाबासाहेबांचा आदर्श घेऊन मोबाईल सोडून पुस्तकांकडे परतावे. ज्या संविधानासाठी आपण सर्वस्व अर्पण करायला तयार आहोत ते संविधान प्रत्येकाने वाचावे असे आवाहन महाराष्ट्रातील ख्यातनाम व्याख्याता ड.वैशाली डोळस यांनी काल (दि ०८ )रोजी जिंतूर येथे माता रमाई जयंती निमित्त आयोजित केलेल्या आंबेडकरवादी व्याख्याना दरम्यान केले आहे. सतीश भैया वाकळे मित्र मंडळाच्या वतीने रमाई जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या आंबेडकरवादी व्याख्यान कार्यक्रमात ड डोळस बोलत होत्या.



जिंतूर शहराच्या वैचारिक वारसाची परंपरा जिवंत राहावी यासाठी माता रमाई जयंतीच्या निमित्ताने जिंतूर नगर परिषद प्रांगणामध्ये आंबेडकरवादी व्याख्यान आणि भीम गीतांचा कार्यक्रम भिमाची वाघीन बुद्ध ,भिम गीताचा प्रबोधनात्मक कार्यक्रम गायिका प्रितीताई भालेराव आणि संच यांचा आणि सुमेध निकाळजे प्रतिष्ठान तर्फे भोजनदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाला जिंतूर शहरातील महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन युवा नेते सतिष भैया वाकळे यांनी केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे

►► पान २ वर

## खासबाग येथे बायोगॅससाठी तयार करण्यात आलेल्या पाण्याच्या हौदाचे योग्य उपाययोजन करा-शेख सलमान



बीड । दिव्य न्युज

लाखो रुपये खर्च करून खासबाग येथे बायोगॅस प्रकल्प उभारण्यात आला होता. मात्र, सद्यस्थितीत त्याची अत्यंत दुर्दशा झाली असून, प्रकल्पाच्या पाण्याच्या हौदात मोठ्या प्रमाणावर मांगुर मासे वाढले आहेत. या माशांचे वजन सुमारे २० ते २५ किलो पर्यंत झाले असून, यामुळे परिसरातील लहान मुले आणि नागरिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे.

खासबाग मैदानावर लहान मुले आणि युवक मोठ्या प्रमाणावर खेळण्यासाठी येतात. परंतु पाण्याचा हौद उघड्यावर असल्याने कोणतेही मूल किंवा नागरिक चुकून पाण्यात पडल्यास जीवितहानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तातडीने हा हौद बंद करून आवश्यक ती सुरक्षा उपाययोजना करणे गरजेचे आहे. याशिवाय, परिसरात काही समाजकंटकांनी अड्डा बनवला असून, येथे बसून गांजा व इतर अमली पदार्थांचे सेवन केल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे सामान्य नागरिक आणि मुलांच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.त्यामुळे, आपण तातडीने पुढील उपाययोजना कराव्यात:

१. पाण्याचा हौद बंद करण्याची तातडीची कारवाई करावी.

२. परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने कठोर पावले उचलावी.

३. अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.

परिसरातील नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात. असे निवेदन बीड नगरपालिका मुख्याधिकारी देण्यात आले. यावेळी मा. एमआयएम बीड जिल्हा अध्यक्ष ड शेख शफीक भाऊ, मा.नगरसेवक मुखीद लाला, जेष्ठ नेते सलाम सेठ,मा.शहर उपाध्यक्ष शेख शाकेर , मा.युवक शहराध्यक्ष सलमान शेख आदी उपस्थित होते.

## सरकारी अभियंता नेमके कोणत्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून शिकून येतात ?- एस.एम.युसूफ

### नाल्यांच्या भिंतीं तिरप्या रेषेत, ना नाल्याला चढ-उतार



बीड । दिव्य न्युज

शहरात सुरू असलेल्या विकास कामांमध्ये रस्ते निर्माण करताना रस्त्याच्या दोन्ही बाजूने असणारे नाले व नाल्या तयार करताना ते सर्रासपणे सपाट आणि दोन्ही बाजूच्या भिंती सरळ उभ्या करण्यात येत आहे. असे नाले व नाल्यांमधून गलिच्छ पाण्याचा प्रवाह वाहून न जाता थांबून राहतो. यामुळे शहरात गलिच्छता तर वाढतेच शिवाय डासांची उत्पत्ती होऊन मोठ्या प्रमाणात डास निर्माण होतात. मात्र याकडे ना बीड नगर परिषद लक्ष देते, ना जिल्हा प्रशासन. म्हणून सरकारी अभियंता नेमके कोणत्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून शिकून येतात? असा उद्विग्न प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून उपस्थित केला आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहरातील नगर नाका ते राजीव गांधी चौकापर्यंतच्या कॅनॉल रोडवर मोठ्या नाल्याचे काम प्रगतीपथावर आहे. असे मोठे नाले बनविताना त्यांना एका बाजूने चढ व दुसऱ्या बाजूने उतार राहणे अपेक्षित असते. शिवाय नाल्याच्या दोन्ही बाजूकडील भिंती सरळ रेषेत न बांधता त्या थोड्याशा तिरप्या रेषेत बांधणे आवश्यक असते. जसे पाटबंधारे विभाग बंधारे बांधताना बंधाऱ्यांच्या दोन्ही बाजूच्या भिंती तिरप्या रेषेत बांधतात. मोठ्या नाल्यांना सुद्धा अशाच प्रकारच्या भिंती बांधणे आवश्यक असताना सरकारी काम करणारे अभियंता मात्र मोठ्या नाल्यांना ना चढ देतात ना उतार देतात. दोन्ही बाजूच्या भिंती तिरप्या रेषेत न बांधता सरळ बांधून टाकतात. अशा सदोष नाले बांधणीमुळे नाल्यात पाणी वाहते न राहता तुंबून राहते. यात मोठ्या प्रमाणात

►► पान २ वर

## १० वी, १२ वी परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी

बीड । दिव्य न्युज

जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा माहे फेब्रुवारी, मार्च, २०२५ मध्ये होत असून परीक्षेमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी, परीक्षा कॉपीमुक्त करण्याकरिता तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात दि. ११ फेब्रुवारी, २०२५ ते १८ मार्च, २०२५ या कालावधीत परिक्षेच्या वेळेच्या १ तास आगोदर ते परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरात व परिक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी मनाई आदेश जारी केले आहेत.

परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असतांना परीक्ष न देणारे विद्याथी आणि इतर काही घटक परिक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षा चालू असतांना उपद्रव करित असतात. परिक्षा चालू असतांना कॉपी देण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेराक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दूरूपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता परिक्षा देणा-य विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी ,कर्मचारी यांना बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये इयत्ता १२ व दहावीच्या परिक्षा केंद्राच्या ठिकाणी व परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात फौज्दारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ ( २ ) करण्यात आले आहे.

या परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी केला असून परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरापर्यंत शासकीय कर्तव्ये पार पाडणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी यांच्या व्यवतिरिक्त दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास, फोटोकॉपी, ई-मेल, इंटरनेट

►► पान २ वर

## देव दर्शनाला गेले अन् चोरट्यांकडून लाखोंची घरफोडी

श्रीक्षेत्र माहूर । दिव्य न्युजः आदेश बेहेरे

माहूर तालुक्यातील वाई बाजार येथील हनुमान मंदीर चौकातील जामा मज्जीदकडे जाणार्या रोडवरील घरातील सर्व सदस्य देव दर्शनाला बाहेरगावी गेलेले असल्याने रात्री उशीरा घराचे कुलूप तोडून लाखो रुपयांची घरफोडी झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.याबाबत सिंदखेड पोलिस ठाण्यात जबरी घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की,नारायण उत्तरवार हे येथील जय योगेश्वर ट्रेडींग कंपणीचे काम पाहतात,त्यांचे घर हनुमान मंदीर चौक जामा मज्जीद रोडवर आहे.नारायण उत्तरवार हे सहकुंटूब मागील २ ते ३ दिवसापासून प्रयागराज येथील कुंभ मेळाव्यासाठी गेले होते.देवदर्शन करुण ते वाई बाजार येथे दि.१० फेब्री.रोजी सकाळी ६ वाजता आले.व घरी पोहचले असता घराचे मुख्य द्वार उघडे दिसून आले,तर घरातील सर्व सामान



अस्ताव्यस्त पडलेले आढळले.बेडरूममधील सोन्याचे दागिने, त्याच्या पावत्या व रोख रक्कम चोरी झाल्याचे आढळून आले. नारायण उत्तरवार यांनी सिंदखेड पोलीसात तक्रार दिली असून सिंदखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर यांनी जबरी घरफोडीचा गुन्हा दाखल केला असून घटनेचा पुढील तपास करीत आहे. याकामीनांदेडचे थम्स पथक व पोलीस श्वान पथकातील हवलदार जोंधळे,चालक हवलदार केंद्रे,श्वान जून,यांनी घटना स्थळावर जावून पाहणी केली.







हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०